महत्त्वाचे



पेठवडगाव : किणी चांदी लूट प्रकरणातील संशयितांना बुधवारी वडगाव येथील न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

किणी चांदी लूट प्रकरणातील संशयितांना ३ दिवस पोलीस कोठडी

पेठवडगाव : पुढारी वृत्तसेवा

कोयत्याचा धाक दाखवत कोल्हापूर-मुंबई बसमधुन किणीजवळ केलेल्या चांदी लूट प्रकरणातील अटक केलेल्या सहा संशयितांना बुधवारी वडगाव येथील न्यायालयासमोर हजर करण्यात आले. त्यानंतर त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. अक्षय कदम (वय ३२), जैद अफगाणी (२१), अमन लियाकत सय्यद (२१), सुजल प्रताप चौगुले (२०), आदिनाथ संतोष विपते (२५), सैफू बशीर अफगाणी (क्लिनर) अशी त्यांची नावे आहेत. मंगळवारी मध्यरात्री कोल्हापूरहून मुंबईकडे जाणाऱ्या अशोका ट्रॅव्हल्सच्या खासगी आराम बसमधुन ६० किलो चांदी, दहा ग्रॅम सोन्याचे दागिने, मशीनचे स्पेअर पार्ट, मोबाईल असा १ कोटी २२ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला होता.

आजऱ्याजवळील अपघातात गडहिंग्लजच्या दोघांचा मृत्यू

आजरा : पुढारी वृत्तसेवा

आजरा-गडहिंग्लज मार्गावर सुलगाव फाट्याजवळ व्हॅनने समोरून येणाऱ्या टेम्पोला धडक दिल्याने दोघांचा मृत्यू झाला. यामध्ये व्हॅनचा चक्काचूर झाला असून, एक महिला जखमी आहे. कृष्णा यल्लाप्पा कांबळे व मनीष श्रीकांत सोलापुरे (रा. गडहिंग्लज) अशी मृतांची नावे असून, गीता कृष्णा कांबळे जखमी आहेत. मनीष सोलापुरे, गीता कांबळे व कृष्णा कांबळे हे मंगळवारी सावंतवाडी येथे भाजीपाला व्यापार करून गडहिंग्लजकडे परत येत होते. यावेळी रात्री दीडच्या सुमारास आजऱ्याजवळील सुलगाव फाट्याजवळ व्हॅनचालक सोलापुरे हे गाडी चालवत असताना डोळ्यांवर झापड आली. याच दरम्यान समोरून मालवाहू टेम्पो येत होता. व्हॅन चुकीच्या बाजूला जाऊन या टेम्पोवर आदळली. यामध्ये कृष्णा कांबळे हे जागीच ठार झाले, तर चालक मनीष सोलापुरे व गीता कांबळे जखमी झाले. सोलापुरे यांना उपचारांसाठी कोल्हापूर येथे नेत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला.

तारापूर एमआयडीसीतील केमिकल कारखान्यात अपघात

बोईसर : पुढारी वृत्तसेवा

तारापूर एमआयडीसी परिसरातील औद्योगिक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, प्लॉट क्रमांक एन १०२/९२ वरील कॅलेक्स केमिकल अँड फार्मासिटिकल लिमिटेड या कारखान्यात सोमवारी दुपारच्या सुमारास अपघात घडला. अभिक्रियक पात्रात कच्चा माल टाकण्याचे काम सुरू असताना आग भडकली. या दुर्घटनेत एक कामगार गंभीर तर दोन कामगार किरकोळ भाजले आहेत. रिऍक्टरमध्ये गोणीतून कच्चा माल टाकण्याची प्रक्रिया सुरू असताना तिसऱ्या गोणीतून माल टाकत असतानाच अचानक रासायनिक अभिक्रियेने आग भडकली. या आगीत रवी शंकर पटेल (३२) हा कामगार गंभीर जखमी झाला. असून सुमारे २५ टक्के भाजल्याचे निदर्शनास आले आहे. अपघाताच्या वेळी रवी शंकर पटेल याला मदत करण्यासाठी पुढे आलेले विपिन कुमार गौतम, आणि राजनबाबू कॉल (२५) हे दोघेही आगीच्या झळांमुळे किरकोळ भाजले आहेत.

राजकीय वैमनस्यातून हाणामारी; आरोपींचे जामीन अर्ज फेटाळले

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

राजकीय वैमनास्यातून दोन गटात झालेल्या हाणामारीत शिंदे शिवसेनेच्या गोगावले गटाला उच्च न्यायालयाने झटका दिला. न्या. माधव जामदार यांच्या एकलपीठाने विकास भरत गोगावले, महेश गोगावले सह आठ जणांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले. शिंदे शिवसेना पक्षाचे आमदार भरत गोगले यांचे सुपुत्र विकास भरत गोगावले आणि अजित पवार राष्ट्रवादी पक्षाचे सुशांत गणेश जांबरे यांच्या गटात सुरुवातीला झालेल्या बाचबाचीचे रूपांतर हाणामारीत झाले. सुशांत जांबरे यांनी पिस्तूल उगरल्याचा राग मनात ठेवून गोगावले गटाने सुशांत जांबरे यांच्या गाड्या फोडल्या. दोन्ही गटाने एकमेकांविरोधात तक्रारी दाखल केल्या. न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर विकास भरत गोगावले, महेश गोगावले, विजय मालुसरे, प्रशांत शेलार, धनजय मालुसरे, वैभव मालुसरे, सुरज मालुसरे, सिध्देश शेठ, सुशांत जांबरे, हनुमंत जगताप, श्रीयश जगताप, निलेश पांडुरंग, यंकट मंडळा, जगदिश जयराम पवार, गोपालसिंह दानसिंह, मनजोतसींग तेजोंदरसींग अरोरा, समिर मधुकर रेवाळे यांनी उच्च न्यायालयात अटकपूर्व जमिनासाठी अर्ज दाखल केले होते.

शरद पवार गटाला काँग्रेसचा अल्टिमेटम

ठाण्यात उमेदवार अभिजित पवार यांच्या प्रचारफेरीवरून आघाडीत मिठाचा खडा

ठाणे : पुढारी वृत्तसेवा

ठाणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी एकीकडे महायुतीमध्ये युती होणार कि नाही याबात तर्क वितर्क सुरु असताना दुसरीकडे जागा वाटपाच्या पूर्वीच ठाण्यात महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याचे समोर आले आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार अभिजित पवार यांनी काँग्रेसला विश्वासात न घेता थेट प्रचारफेरी काढल्याने राष्ट्रवादीच्या या वर्तनावर काँग्रेसचे ठाणे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी आक्षेप घेतला आहे. राष्ट्रवादीने काँग्रेसने आपले अशाप्रकारेचे वर्तन सुधारावे, असे सांगत त्यांना ४८ तासांचा अल्टीमेटम दिला असल्याची माहिती ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी दिली आहे. त्यामुळे अभिजित पवारमुळे निवडणुकीच्या आधीच महाविकास आघाडीत मिठाचा खडा पडला असल्याची आता राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहे.

बुधवारी काँग्रेस मुख्य कार्यालयात पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ठाणे महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर महाविकास आघाडीचे अद्याप अधिकृत जागावाटप झालेले नाही. असे असताना कळवा प्रभाग क्रमांक नऊ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे ठाणे शहर अध्यक्ष अभिजीत पवार यांनी पक्षाचे नेते आ. जितेंद्र आव्हाड, जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान आणि ऋता आव्हाड यांच्या उपस्थितीत भव्य स्वरूपात रॅली काढली.

पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकीत महाविकास आघाडीतील सर्वच पक्षांमध्ये उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. राष्ट्रीय पक्ष असल्याने महायुतीच्या विरोधात कडवी लढत देण्यासाठी सज्ज असुन जागावाटपात काँग्रेसने ३५ जागांचा प्रस्ताव दिलेला आहे. असे असताना आघाडीतील सहयोगी पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस परस्पर उमेदवार जाहिर करते हे आघाडीच्या भवितव्याला पोषक नाही, आघाडीतील पक्षाने स्वतःच्या पक्षाचा उमेदवार म्हणुन उमेदवारी दाखल केली असती तर चालले असते. अशा प्रकारे अभिजीत पवार यांनी स्वतःला मविआ आघाडीचा उमेदवार घोषीत करून जाहिर रॅली काढणे कितपत योग्य आहे. रॅलीला राष्ट्रवादीचे अध्यक्ष स्वतः जातात? असा सवाल करून विक्रांत चव्हाण यांनी, आघाडीतील अन्य घटकपक्षांना खडे बोल सुनावले.

काँग्रेस कुणाच्या मागे फरफटत जाणार नाही

● या आधी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत फोन करून बोलवले तेव्हा काम केले. काँग्रेसचा वापर करून घेतला. कळव्यात राष्ट्रवादी काँग्रेस रिकामी झाली आहे. कळव्यात चार चार उमेदवार तयार आहेत. काँग्रेस कुणाच्या मागे फरफटत जाणार नाही. असे ठणकावत विक्रांत चव्हाण यांनी राष्ट्रवादीने याबाबत स्पष्टीकरण द्यावे, असा इशारा देत काँग्रेसकडे स्वबळावर लढण्याचा शेवटचा पर्याय असेल, असेही विक्रांत चव्हाण म्हणाले.

दोन चिमुकल्यांची वेठबिगारीतून सुटका

नालासोपारा : नालासोपारा पूर्वेकडील धानीव बाग तलाव परिसरात दोन बालकामगारांची वेठबिगारीतून सुटका करण्यात आली आहे. एका आस्थापनेत दोन चिमुकल्या बालकामगारांकडून जास्तीचे श्रमाचे काम करून त्यांचे मानसिक व शारीरिक शोषण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी मालकाने आपल्या आस्थापनेत ८ वर्षे व ५ वर्षे वयाच्या दोन बालकामगारांना कामावर ठेवले होते. या अल्पवयीन मुलांकडून अधिक श्रमाचे काम करून घेतले जात असून त्यांचा छळ होत असल्याचे सकृतदर्शनी आढळून आले. या प्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. सह्याद्री सहकारी बँक लि., मुंबई

४४६, जगन्नाथ शंकरशेट मार्ग, चिराबाजार, मुंबई - ४०० ००२.

सूचना

खात्यांचे केवायसी (KYC) पुन्हा करणे - ज्या ग्राहकांनी अद्याप केवायसी आणि प्रोफाइल अपडेट करण्यासाठी कागदपत्रे सादर केलेली नाहीत, त्या सर्व ग्राहकांना बँकेच्या नोंदी अद्ययावत करण्याकरिता त्यांचे अद्ययावत छायाचित्र, ओळखपत्र पुरावा, पत्त्याचा पुरावा आणि पॅन क्रमांक/फॉर्म ६० त्वरित सादर करण्याची विनंती करण्यात येत आहे. ग्राहक आवश्यक केवायसी कागदपत्रे (ओळखपत्र आणि पत्त्याचा पुरावा) पोस्टाद्वारे, नोंदणीकृत ई-मेलद्वारे किंवा त्यांच्या प्रतिनिधीमार्फत पाठवू शकतात. तसेच, ग्राहक ऑनलाइन केवायसी सादर करण्यासाठी आमच्या बँकेच्या www.thesahyadribank.com या वेबसाइटचा वापर करू शकतात. केवायसीचे पालन न केलेल्या सर्व खात्यांमध्ये "डेबिट फ्रीझ" (Debit Freeze) लागू करण्यात येईल.

निष्क्रिय खाती (Dormant Accounts) - ज्या ग्राहकाचे खाते व्यवहार न झाल्यामुळे "निष्क्रिय" झाले आहे, त्यांनी खाते पुन्हा चालू (operative) करण्यासाठी शाखा व्यवस्थापकांशी संपर्क साधावा आणि अद्ययावत फोटो व केवायसी कागदपत्रे (ओळखपत्र आणि पत्त्याचा पुरावा) सादर करावीत. बचत/चालू खाते २ वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी (ग्राहकाने तसेच तृतीय पक्षाने कोणताही जमा किंवा नावे व्यवहार केला नसल्यास) व्यवहार न झाल्यास ते निष्क्रिय मानले जाते.

नामांकन सुविधा (Nomination Facility) – कृपया आपल्या खात्यात वारस नोंदणी करून नामांकन सुविधेचा लाभ घ्यावा.

नोंद अद्ययावत करण्यासाठी कृपया आपला मोबाईल/टेलिफोन क्रमांक/ई-मेल आयडी देखील द्यावा.

आम्हाला उत्तम सेवा देण्यासाठी आपले सहकार्य अपेक्षित आहे.

दिनांक : २५ डिसेंबर, २०२५
स्थळ : मुंबई

सही/-
डॉ. एम.डी. पै
सरव्यवस्थापक

एकनाथ शिंदे-गणेश नाईक यांच्यातील मतभेद संपुष्टात?

दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा; नवी मुंबई-ठाण्यावर खलबते

ठाणे : पुढारी वृत्तसेवा





राज्याच्या राजकारणात ठाणे आणि नवी मुंबईतील सत्तासमीकरणे नेहमीच चर्चेचा विषय राहिली आहेत. विशेषतः, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्याची कमान हाती घेतल्यापासून त्यांचा आणि मंत्री गणेश नाईक यांच्यात सुप्त संघर्ष सुरू झाला. नाईक मंत्री झाल्यानंतर त्यांनी सुरू केलेल्या जनता दरबारांनी या संघर्षाला व्यापक वळण मिळाले. मात्र, अचानक या दोन्ही नेत्यांनी मंत्रालयात बंद दाराआड चर्चा केल्याने आपसातील वाद संपुष्टात येऊन त्यांचे मनोमिलन झाले की काय, अशा चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्या आहेत.

गेल्या तीन दशकांहून अधिक काळ नवी मुंबई हा गणेश नाईक यांचा बालेकिल्ला मानला जातो. दुसरीकडे, एकनाथ शिंदे यांनी गेल्या काही वर्षांत ठाण्यापलीकडे जात नवी मुंबईतही संघटनात्मक जाळे विणण्याचा प्रयत्न सुरू केल्याने या दोन्ही नेत्यांमध्ये संघर्ष सुरू झाला. नवी मुंबई महापालिकेत भाजपने स्वतंत्र लढण्याची भूमिका घेतल्याचे गणेश नाईकांनी अनेकदा अप्रत्यक्षपणे सांगितले. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर हा वाद तीव्र झाला होता. अशात शिंदे आणि नाईक यांच्यात मंत्रालयात बंद दाराआड १५ मिनिटांहून अधिक काळ चर्चा झाल्याने, ही भेट राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे.

● नवी मुंबई पालिकेची निवडणूक भाजप आणि शिवसेनेने महायुती म्हणून लढवावी, यावर दोन्ही नेत्यांचे बैठकीत एकमत झाल्याचे कळते. शिवाय, जागावाटपाचा फॉर्म्युलादेखील अंतिम झाला असून, ठाणे आणि पालघरमधील अन्य पालिकांबाबतही या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

तीन लाखांच्या खेळण्यांची चोरी

भिवंडी : अज्ञात चोरट्याने घरफोडी करून गोदामातून ३ लाखांची खेळणी चोरून नेल्याची घटना दापोडे येथून समोर आली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याच्या विरोधात ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येथील व्यावसायिक ओमप्रकाश अगरवाल (६४) यांच्या कंपनीच्या गाळ्याचे शटरचे अज्ञात चोरट्याने लॉक तोडून ३ लाखांची खेळणी चोरून नेली.

जाहीर सूचना

मेसर्स पीएल७ रियल्टी प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे सी.टी.एस. ७, पी. एल. लोखंडे मार्ग, गोवंडी, मुंबई-४०००४३ येथील भूखंडावर प्रस्तावित असलेल्या "शिवनेरी एसआरए", बिझनेस बे या निवासी आणि व्यावसायिक पुनर्विकास प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभाग, राज्यस्तरीय पर्यावरण आघात निर्धारण प्राधिकरणाकडून (SEIAA) २२ डिसेंबर, २०२५ रोजी पर्यावरण विषयक नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. सदर नाहरकत प्रमाणपत्राच्या प्रती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध आहेत आणि http://parivesh.nic.in या संकेतस्थळावर देखील पाहता येतील.

जाहिर नोटीस

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कोर्टात

कु.का.क.३२ ग केस नंबर ४६/२०२५

सामनेवाले नं. १. श्री.शामवेल रॉबीन चक्रनारायण २. श्री. प्रकाश डेव्हीड चक्रनारायण ३.श्री.विकास डेव्हीड चक्रनारायण ४. श्रीम. सर्वता जेकब गायकवाड, ५. श्रीम. मंगल वसंत कोळी, ६. श्रीम. रेखा जोसेफ क्षेत्रे ७. श्रीम. छाया डेव्हीड चक्रनारायण अ. क्र. १ रा. बदलापूर म्हाडा कॉलनी, शिवनेरी बिल्डिंग, जिल्हा ठाणे अ.क्र. २,३,४ रा. साईधाम चाळ, पुणा लिंक रोड, कल्याण ईस्ट जिल्हा ठाणे अ. क्र. ५,६,७ रा. उरण जुना कोळीवाडा, ता. पनवेल, जिल्हा रायगड यांना या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे नेवासा खुर्द, ता. जि. अहिल्यानगर येथील गट नं. ९४/१/१ मधील क्षेत्राची कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये चौकशी होऊन खरेदीखत करुन मिळण्यासाठी या न्यायालयात दावा कुळ कायदा केस क्र./ईक्यूजे नं. ४६/२०२५ मध्ये चालू असून अर्जाचे सुनावणी कामी तुमचे पत्त्यावर वारंवार नोटीस पाठवूनही बजावणी होत नसलेने तुमचे विरुद्ध मे. कोर्टाने जाहीर नोटिसीचा आदेश केलेला आहे.

प्रस्तुत विलंब माफी अर्जामध्ये सुनावणी दिनांक ३०/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा. तहसिलदार नेवासा तहसिल कार्यालय नेवासा यांचे दालनात नेमण्यात आली आहे. सबब तुम्ही किंवा तुमच्या कायदेशीर प्रतिनिधींनी तुमचा कोणताही पुरावा असल्यास त्यासह सदरहू तारखेस ठिकाणी व वेळी माझेसमोर उपस्थित रहावे. वर निर्दिष्ट केलेल्या वेळी व ठिकाणी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या किंवा कायदेशीर प्रतिनिधीच्या अनुपस्थितीत विलंब माफी अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन योग्य तो निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सदरील जाहिर नोटीस माझे सही व शिक्यानिशी आज दिनांक १६/१२/२०२५ रोजी दिली असे.

तहसिल कार्यालय नेवासा
कु.का.क.३२ग केस नं.४६/२०२५

सही/-
डॉ. संजय बिरादार
तहसिलदार, नेवासा

जाहिर सूचना

१. **"प्रोबासी बंगाली समिती-ठाकुर्ली"** या सार्वजनिक ट्रस्टच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेच्या / एक बीएचके निवासी फ्लॅट "जसे आहे जेथे आहे" या आधारावर विक्रीसाठी संभाव्य खरेदीदाराकडून मोहोरबंद लिफाफ्यात प्रस्ताव/बोली मागविण्यात येत आहेत, ज्याचा पी.टी.आर. क्र. **एफ/५३४९/ठाणे** असा आहे.

२. मालमत्तेचे वर्णन :- बालाजी अंगण गृहनिर्माण संकुलातील शिवम - सीएचएस मधील 'अ' विंग, फ्लॅट क्र. ००२, एक बीएचके निवासी फ्लॅट, मापित ५३४ चौरस फूट (अंदाजे) बांधिव क्षेत्रफळ, ९० फूट रोड, सर्वे क्र. चोळे जुना स. क्र. २४२/ए १/१ भाग, नवीन स. क्र. २८, हिस्सा क्र.१/१ भाग, कांचनगाव जुना स. क्र.१२८/४ भाग, नवीन स. क्र. ९० हिस्सा क्र. २, ४अ आणि ४ब, ठाकुर्ली-पूर्व-४२१२०१ येथे स्थित आहे.

३. सदर सदनिकेची राखीव किंमत ४१,००,०००/- (एकेचाळीस लाख रुपये) असेल. प्रस्ताव/बोली प्रोबासी बंगाली समिती-ठाकुर्ली यांच्या नावे पे ऑर्डर/डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात रु. ५०,०००/- (पन्नास हजार रुपये फक्त) चा इसारा रक्कम ठेव (इरठे) सोबत असावा. ईएमडीशिवाय प्रस्ताव/बोलीचा विचार केला जाणार नाही. प्रस्ताव/बोली मोहोरबंद लिफाफ्यात असाव्यात, जो ट्रस्टच्या नोंदणीकृत कार्यालयात श्री. अनिल साहा, ट्रस्टचे अध्यक्ष (प्रोबासी बंगाली समिती-ठाकुर्ली, मोबाईल क्रमांक ९८२१९२६९६५), यांच्याकडे दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत, सदर सूचना प्रकाशित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत म्हणजेच २५/०१/२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावा.

४. विक्री धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्या पूर्वपरवानगीच्या अधीन असेल. विश्वस्तांना कोणतेही कारण न देता कोणतीही बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार आहे.

५. सशर्त प्रस्ताव स्वीकारल्या जाणार नाहीत आणि विश्वस्तांना कोणतेही कारण न देता कोणतीही बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा सर्व अधिकार असतील.

दिनांक : २५.१२.२०२५

सही/-
प्राधिकृत विश्वस्त
"प्रोबासी बंगाली समिती-ठाकुर्ली"

PUBLIC NOTICE

Public at large is hereby informed that **Mr. Anil Namdeo Sawant** is the owner in respect of **Flat No. 25,** admeasuring **225 sq ft Carpet Area, on the 4th floor,** in the **Building No. 08** and the society known as **Vishal Sahyadri Co-operative Housing Society Ltd;** situate at **Sahyadri Nagar, Charkop, Kandivali (W), Mumbai 400067** within the limits of Brihanmumbai Municipal Corporation. The abovesaid Owner has lost / misplaced the following Original documents:

a) Letter of Allotments of Residential Accommodation dt. 30/04/1982 issued in the name of Late Shri. Namdeo Antu Sawant by The Cloth Markets and Shops Board for Greater Bombay.

b) Other title deeds, if any.

If any person has any claim, right, title or interest of any nature whatsoever in regard to the abovesaid property shall write to the undersigned within 14 days from the date of publication of this notice hereof, whereafter no claims or objections would be entertained and which would be deemed to have been waived.

Sd/-
Sujay T. Kumbhar
Advocate High Court
1st Floor, Surana House,
Court Naka Thane 400601.
Place : Thane **Date :** 25/12/2025

PUBLIC NOTICE

Public at large is hereby informed that **Mrs. Kalpana Pratap Chavan** is the owner in respect of **Flat No. 01,** admeasuring **225 sq ft Carpet Area, on the Ground Floor,** in the **Building No. 06** and the society known as **Vishal Sahyadri Co-operative Housing Society Ltd;** situate at **Sahyadri Nagar, Charkop, Kandivali (W), Mumbai 400067** within the limits of Brihanmumbai Municipal Corporation. The abovesaid Owner has lost / misplaced the following Original documents:

a) Letter of Allotment of Residential Accommodation dt. 01/05/1980 issued in the name of Late Shri. Pratap Baburao Chavan by The Coloth Markets and Shops Board for Greater Bombay.

b) Other title deeds, if any.

If any person has any claim, right, title or interest of any nature whatsoever in regard to the abovesaid property shall write to the undersigned within 14 days from the date of publication of this notice hereof, whereafter no claims or objections would be entertained and which would be deemed to have been waived.

Sd/-
Sujay T. Kumbhar
Advocate High Court
1st Floor, Surana House,
Court Naka Thane 400601.
Place : Thane **Date :** 25/12/2025

जाहीर नोटीस

शैलेंद्र नगर श्री समर्थ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पत्ता शैलेंद्र नगर श्री समर्थ को. ऑप. हाऊसिंग सोसायटी या संस्थेचे सभासद असलेल्या व संस्थेच्या ६/अ इमारतीत सदनिका क्र.००५ धारण करणारे श्री. वसंत ज्ञानोबा फणसे यांचे दिनांक २७ ऑगस्ट २०२३ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था या नोटीशीव्दारे संस्थेच्या मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पृष्टर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाल्या नाही तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतणावावत संस्थेच्या उपविधी नुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या/हरकत आल्या तर त्यावावत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास/हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांच्याकडे रविवारी सकाळी ११.३० ते दुपारी १.३० पर्यंत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलव्थ राहील.

शैलेंद्र नगर श्री समर्थ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या यांच्याकरिता आणि वतीने

सही/-
सचिव

ठिकाण: मुंबई दिनांक:२५.१२.२०२५

फॉर्म जी (रिवाईज्ड)

बाजोलगा गाव, तालुका: भालकी, जिल्हा बिदर (कर्नाटक) येथील साखर उद्योग भालकेश्वर शुगर्स लिमिटेड (सीआयआरपी अंतर्गत) करिता स्वारस्य अभिव्यक्तींचे आमंत्रण

(नादारी आणि दिवाळखोरीपणा (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए (१) अन्वये)

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन/सीआयएन/एलएलपी क्र:	**भालकेश्वर शुगर्स लिमिटेड** सीआयएनः U15421KA2000PLC027184
२.	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	बाजोलगा, ता. भालकी, जि.: बिदर, कर्नाटक - ५८५३२८.
३.	वेबसाईटचे यूआरएल	उपलब्ध नाही
४.	बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील	फॅक्टरी साईटः बाजोलगा, ता. भालकी, जि.: बिदर, कर्नाटक - ५८५३२८.
५.	मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता	मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमताः **उस गाळपः** ४,००० टीसीडी. **डिस्टिलरीः** १२० केएलपीडी. **सह-निर्मिती प्रकल्पः** १७ मे.वॅ. (साखर प्रकल्प - १४ मे.वॅ. आणि डिस्टिलरी प्रकल्प - ३ मे.वॅ.)
६.	गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य	मागील आर्थिक वर्षात विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचा प्रमाण आणि मूल्यः **साखरः** २.६१ लाख क्विंटल - ८७.८० कोटी रुपये. **डिस्टिलरी उत्पादनेः** १२८.५४ लाख लिटर - ८१.४६ कोटी रुपये. **सह-निर्मिती (वीज)ः** ४६.१३ लाख केडब्ल्यूएच - रु. १.८७ कोटी
७.	कर्मचारी/कामगारांची संख्या	कॉर्पोरेट कर्जदाराचा ताबा घेताना, आरपीला असे कळवण्यात आले की, कॉर्पोरेट कर्जदाराने एका तृतीय पक्षासोबत (भाडेकरू) भाडेपट्टा करार केला आहे. त्यानुसार, **सध्या कॉर्पोरेट कर्जदाराचे फक्त सहा कर्मचारी कार्यरत आहेत** आणि कॉर्पोरेट कर्जदाराच्या अंतर्गत **कोणताही कामगार** कामावर नाही. त्या जागेवर काम करणारे इतर कर्मचारी हे भाडेकरूचे कर्मचारी आहेत.
८.	गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी, त्यानंतरच्या प्रक्रियेच्या घटनांच्या संबंधित तारखा समाविष्ट असलेले पुढील तपशील उपलब्ध असण्याचे ठिकाणः	bslcirp@gmail.com येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील.
९.	संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असण्याचे ठिकाणः	पात्रता निकष नमूद केलेल्या स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण bslcirp@gmail.com येथे ईमेल पाठवून प्राप्त करता येतील.
१०.	स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांकः	शुक्रवार, ९ जानेवारी, २०२६ (१५ दिवस)
११.	संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक	गुरूवार, १५ जानेवारी, २०२६ (६ दिवस)
१२.	तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक	मंगळवार, २० जानेवारी, २०२६ (५ दिवस)
१३.	संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक	बुधवार, २१ जानेवारी, २०२६ (१ दिवस)
१४.	संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक	बुधवार, २१ जानेवारी, २०२६
१५.	ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक	शनिवार, २१ फेब्रुवारी, २०२६
१६.	स्वारस्य अभिव्यक्ती सादर करावयाचा प्रक्रिया ईमेल आयडी	bslcirp@gmail.com
१७.	एमएसएमई म्हणून कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणी स्थितीचा तपशील	**एमएसएमई नोंदणी क्रमांकः** UDYAM-KR-06-0036692 **उद्योगाचा प्रकारः** मध्यम **नोंदणीची तारीखः** ५ एप्रिल, २०२५ **वैधता / उद्यम नोंदणीची स्थितीः** सक्रिय

सही/-
रितेश आर. महाजन (ठराव व्यावसायिक)
भालकेश्वर शुगर्स लिमिटेड (सीआयआरपी अंतर्गत) करिता
आयपी नोंदणी क्रमांकः IBBI/IPA-002/IP-N00048/2017-18/10132
बी-२०३, देवगिरी, गणेशमाला, सिंहगड रोड, पुणे - ४११०३०
एएफए वैधता दि. ३१.१२.२०२६ पर्यंत

दिनांकः २५.१२.२०२५
ठिकाणः पुणे

महामार्गासाठी पूर्णवेळ प्रकल्प संचालक नियुक्त करा : हायकोर्ट

कोल्हापूर : विशेष प्रतिनिधी

नागपूर-रत्नागिरी या सुरू असलेल्या महामार्गाच्या कामासाठी पूर्णवेळ प्रकल्प संचालक नेमण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला दिले. दै. 'पुढारी'ने नोव्हेंबरमध्ये वृत्तमालिका प्रकाशित केली होती. याचिकेतील समाविष्ट मुद्द्यांचे स्पष्टीकरण देण्यासाठी प्राधिकरणाला १५ जानेवारीपर्यंत मुदत दिली आहे.

सध्या पश्चिम महाराष्ट्रातून एकूण पाच महामार्गांची कामे सुरू आहेत. मागील तीन-चार वर्षांपासून रुंदीकरणाचे काम सुरू असलेला कागल-सातारा महामार्ग, रत्नागिरी-नागपूर महामार्ग, वर्धा ते गोवा शक्तिपीठ महामार्ग, नवीन पुणे-बंगळूर महामार्ग आणि अणुस्कुरा-विटा महामार्ग, अशी पाच महामार्गांची कामे सध्या सुरू आहेत. राष्ट्रीय महामार्गाच्या कोल्हापूर विभागासाठी प्रकल्प संचालक हे पद आहे. मात्र, गेल्या कित्येक महिन्यांपासून हे पद रिक्त आहे. या पदाचा अतिरिक्त कार्यभार राष्ट्रीय महामार्गाच्या पुणे विभागाच्या प्रकल्प संचालकांकडे आहे; पण त्यांना कोल्हापूर विभागासाठी वेळ देता येत नाही. त्या भागात राष्ट्रीय महामार्गाचा पूर्णवेळ अधिकारी पाहिजे, दै. 'पुढारी'ने आपल्या स्पष्ट केले होते. याबाबत अतुल अण्णासाहेब चौगुले यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ३० मे २०२५ रोजीच या कामाची मुदत संपलेली आहे. याबाबत नागरिकांना अनेक अडचणी येत आहेत; या कामासाठी पूर्णवेळ प्रकल्प संचालक नाहीत, असे मुद्दे या याचिकेत मांडण्यात आले.

न्यायालयाचा नेमके आदेश काय?

याचिकेची दखल घेत कोल्हापूर सर्किट बेंचच्या न्या. एम. एस. कर्णिक, न्या. अजित बी. कडेठाणकर यांच्या डिव्हिजनल बेंचने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला नागपूर-रत्नागिरी महामार्गाच्या या भागातील कामासाठी प्रकल्प संचालक नेमण्याचे आदेश दिले आहेत.

मुंबईत होणार 'ट्रॅफिक पार्क'

मोटार परिवहन विभागाच्या मोकळ्या जागांचा वापर

मुंबई/सातारा : प्रवीण शिंगटे

विद्यार्थीदशेपासून शालेय विद्यार्थ्यांवर वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचे संस्कार व्हावेत, वाहनधारकांत रस्ता सुरक्षिततेबद्दल जनजागृती व्हावी, ज्येष्ठांना विरंगुळा मिळावा, या तिहेरी उद्देशाने राज्यातील ६० प्रादेशिक परिवहन कार्यालय व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांत स्वर्गीय आनंद दिघे ट्रॅफिक पार्क उभारण्याचा निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे. यामध्ये मुंबईमधील मुंबई मध्य, पश्चिम, पूर्व, बोरिवली, वडाळा, ठाणे, कल्याण, नवी मुंबई, वसई, पनवेलचाही समावेश करण्यात आला आहे.

रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत ज्या शहरांमध्ये प्रादेशिक अथवा उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आहेत त्या शहरांत स्वर्गीय आनंद दिघे ट्रॅफिक पार्क निर्माण करण्यात येणार आहे. तेथे शालेय विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना वाहतुकीच्या नियमांचे आकलन करून देणे, ज्येष्ठ नागरिकांना विरगुंळ्याचे ठिकाण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी परिवहन विभागाच्या किमान १ एकर जागेमध्ये १ कोटी रुपये खर्च करून हे ट्रॅफिक पार्क उभारण्यात येणार आहे.

सध्या मोटार परिवहन विभागाकडे असलेल्या मोकळ्या जागेमध्ये हे ट्रॅफिक पार्क उभारले जाणार आहेत. जिथे मोटार परिवहन विभागाची जागा नसेल तेथे महापालिका, नगरपालिकासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून अशी जागा विकसित करण्यात येणार आहे.

'या' ठिकाणी होणार 'ट्रॅफिक पार्क'

● राज्यातील पुणे, पिंपरी-चिंचवड, बारामती, नाशिक, मालेगाव, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, इचलकरंजी, सोलापूर, अकलूज, नागपूर, नागपूर शहर, वर्धा, नागपूर ग्रामीण, रायगड, रत्नागिरी, सातारा, कराड, फलटण, अहिल्यानगर, श्रीरामपूर, पेण, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव, चाळीसगाव, भडगाव, जालना, बीड, अंबेजोगाई, लातूर, उदगीर, धाराशिव, नांदेड, परभणी, हिंगोली, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलडाणा, वाशिम, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या ठिकाणी स्वर्गीय आनंद दिघे ट्रॅफिक पार्क होणार आहेत.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, **१. श्रीमती अल्पिता कुणाल नाईक, २. श्री. धिरज वसंत नाईक व ३. श्री. बबन जगन्नाथ म्हात्रे** सर्व राहणार ता. वसई, जि पालघर यांच्या सहमालकीची व प्रत्यक्ष कबज्याची मौजे जुन्नरपाडा, तालुका डहाणू, जिल्हा पालघर येथील खालील वर्णनाची जमीन आहे ज्याचे तपशील

सर्व्हे नं.	क्षेत्र हे. आर. चौ. मी.	आकार रु. पैसे	एकूण क्षेत्रा पैकी विक्री क्षेत्र हे. आर. चौ. मी.
१४३/१/११	१-२६.१०	१-०८	०-२२-००

अशी जमीन इजमेण्टच्या स्वरुपाच्या व इतर सर्व हक्कासहीत ज्यास हयापुढे एकत्रीतरित्या सोयीसाठी "सदरहू मिळकत" असे संबोधिणेंत आले आहे.

सदरहू मिळकत माझे अशिलांनी कायमची विकत घेणेचे ठरविले आहे व त्याकरीता सदर मालकांबरोबर सौदा केला आहे.

सदरहू मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्याअगोदर सदरहू मिळकतीबाबत कोणाचाही कबजा, गहाण, दान, बक्षीस, भाडेपट्टा, साठेखत, खरेदीखत, हस्तांतरण, बोजा अगर इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, हितसंबंध, पोटगी, मजूरी, प्रोविडंट फंड, ग्रेच्यूईटी, वगैरे कांहींही मागणी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत खालील सही करणार यांच्या पत्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह हरकत घ्यावी सदर हरकत अयोग्य वाढल्यास किंवा जर कोणीही मुदतीमध्ये हरकत न घेतल्यास सदरहू मिळकती संबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काहीही हक्क, दावा, हितसंबंध, तक्रार नाही किंवा असल्यास त्यांनी तो सोडून दिलेला आहे असे समजून माझे अशिल सदरहू मिळकतीचे पुढील व्यवहार करतील व रजिस्टर खरेदीखत करुन घेतील, मात्र त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ता. २५/१२/२०२५
पत्ता: घर क्र. २०६९, गणेश कृपा, मु. पो. सावटा,
ता. डहाणू, जिल्हा पालघर, पिन कोड ४०१ ६०२

सही/-
श्री. राहुल राजेंद्र बोथरा
(खरेदीदारांचे वकील)
मो.नं ९८२०४५३६८३

भारत सरकारद्वारे विद्यावेतन आधारित इंटर्नशिप

कार्यानुभवाआधारित अंतर्गत सी-डॅक, सर्ट-इन, सी-मेट, एरनेट, नॅयलीट, समीर आणि एसटीक्यूसी मध्ये संधी (संपूर्ण भारतभर)

तंत्रज्ञान क्षेत्रे

एआय, मशीन लर्निंग, बी.डी.ए., मशीन व्हिजन, आर.पी.ए., ए.आर./व्ही.आर. ब्लॉकचेन, सीपीयू डिझाइन, वायरलेस नेटवर्क्स, आय.ओ.टी., एज आणि क्लाउड कॉम्प्युटिंग. सायबर सुरक्षा, सायबर फॉरेन्सिक, हेल्थ इन्फॉर्मेटिक्स, सॉफ्टवेअर डिफाईन्ड रेडिओ, सिलिकॉन फोटोनिक्स,स्मार्ट सिटी, क्वांटम कॉम्प्युटिंग, मटेरिअल इलेक्ट्रॉनिक्स, पॅकेजिंग, बॅटरी, ॲडिटिव्ह उत्पादन, नूतनीकरणक्षम ऊर्जा आणि तंत्रज्ञान क्षेत्रे.

भारत सरकार, MeitYद्वारे अर्थसहाय्यित

भारत सरकारच्या अंतर्गत येणाऱ्या अग्रगण्य संस्थांमधील अत्याधुनिक राष्ट्रीय प्रकल्पांवर काम करून व्यावसायिक कौशल्ये वृद्धिंगत करण्याची ही एक संधी आहे. याद्वारे तुम्हाला प्रत्यक्ष व्यावहारिक अनुभव, तांत्रिक ज्ञान, विश्लेषणात्मक विचार, रिअल-टाइम वर्किंग, समस्या निवारण, तर्कशक्ती आणि वैचारिक कल्पकता (MeitY) यांसारखी कौशल्ये विकसित करता येतील.

सहभागी संस्था

जानेवारी २०२६ बॅचसाठी नोंदणी

कालावधीः ६ महिने

विद्यावेतन : रु. १०,०००/महिना

अर्ज करण्याची शेवटची तारीख : १२ जानेवारी २०२६

पात्रता

● बी.टेक / बी.ई. / एम.सी.ए. / एम.एससी. मागील ३ वर्षांत उत्तीर्ण झालेले (संबंधित विद्याशाखा).
● बी.ई. / बी.टेक. / एमसीए / एम.एससी.च्या अंतिम वर्षात शिकत असलेले विद्यार्थी.
अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक मधील विद्यार्थी.
● महिला विद्यार्थी.

Vacancies-442

आताच अर्ज कराः https://internship.aicte-india.org/ernet.php किंवा https://wblp.in/wbl-Opportunities

सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग, मोहाली.

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकारची एक वैज्ञानिक संस्था
पत्ता: ए-३४ इंडस्ट्रियल एरिया, फेज ८, मोहाली, पंजाब, भारत.
फॅक्सः +९१-१७२-२२३७०५०-५१। www.cdac.in wblp@cdac.in

cbc06134/11/0001/2526